Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
English Part - VII /
Marathi Part - IV

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आदिवासी साहित्यात बाबाराव मडावी यांचे योगदान<br>**प्रा. नितीन जगदिश टेकाम** | १-५ |
| २ | स्त्री आरोग्य आणि आहार<br>**कलपना गोंडे**<br>**पूजा तिवारी** | ६-८ |
| ३ | भारताची इंटरनेट वापरामुळे झालेली प्रगती<br>**प्राचार्य डॉ. दिनेश निश्चित** | ९-१२ |
| 4 | Role of Technology in Changing Social Life<br>**प्रा. डॉ. सौ. माणिक ना. मेहरे** | 13-18 |
| ५ | संस्कृत साहित्य आणि शैक्षणिक मूल्य<br>**सौ. सुवर्णा नितीन मुन्हेकर** | १६-२० |
| ६ | अध्यापनाच्या यशस्वितेसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे योगदान<br>**प्रा. निता प्रभाकरराव राऊत** | २१-२५ |

# १. आदिवासी साहित्यात बाबाराव मडावी यांचे योगदान

प्रा. नितीन जगदिश टेकाम
सहा. प्राध्यापक, श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा.

मराठी साहित्याच्या प्रवाहात १९६० नंतर वेगवेगळे विचारप्रवाह उदयात आले. १९६० नंतर सर्व स्तरावर ज्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय उलथापालथी झाल्या त्यातून ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य या सारखे अनेक साहित्य प्रवाह आप–आपल्या जीवन जाणीवा परखडपणे मांडू लागल्या. या प्रवाहात अन्य साहित्य प्रवाहाबरोबर आदिवासी साहित्याने आपला ठसा जनमनावर उमटवत साहित्याच्या अनुषंगाने जंगल जिव्हाऱ्यातील जीवन–जाणीवा, प्रश्न, समस्या मांडायला सुरवात केली. १८ व्या शतकात ज्या मोठ–मोठ्या राज्यक्रांत्या, उलाढाल्या झाल्या त्याचा परिणाम या वनपूत्रावर झाला. आदिवासी जंगल–जिव्हाऱ्यातून, दऱ्याखोऱ्यातून वास्तव सोडून नागरी जीवनात आला. त्यातून स्वत:चा आत्मशोध घेऊ लागला जंगल जिव्हाऱ्यातील होणारे आदिवासींचे शोषन, निसर्गनिष्ठ संस्कृती, रूढी, प्रथा, परंपरा याचा वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांनी संशोधन केले. त्या शास्त्रज्ञांनी केलेले संशोधन मराठी मानसापर्यंत पोहचले. त्यानंतर मराठी लेखकांनी आपला मोर्चा आदिवासीकडे वळवला मराठीच्या माध्यमातून आदिवासींच्या जीवन जाणिवांचा शोध घेण्यास मराठी लोकसाहित्याच्या रूपाने आदिवासी लोकसाहित्याचे अंतरंग मराठी साहित्यात उतरायला लागले. मराठीत आदिवासी आणि आदिवासीऐतर वर्गानी काव्य, कथा, कादंबरी, आत्मचरित्र याच्या माध्यमातून आदिवासींच्या जीवनाविषयी मोठ्या प्रमाणात लिखान केले. या लिखानातून वर्तमानकालीन, भूतकालीन जाणीवा मांडल्या गेल्या. या जीवन जाणिवांनी मराठी साहित्यात मोलाची भर घालून मराठीला पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न केला असे म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

"आदिवासी साहित्य हे वन संस्कृतीचं नातलग होय. आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य होय. ज्यांच्या प्रश्नाला भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे हे साहित्य आहे. त्याच्या आक्रोशाचा इथल्या सावत्र समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही, अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांतिसाहित्य होय. इथल्या क्रूर कठोर न्यायव्यवस्थेने त्यांच्या शेकडो पिढ्यांना आजीवन वनवास ठोठावला. त्या आदिवासी समूहांचे ते मुक्तिसाहित्य होय. आदिवासींचे घायाळ आयुष्य ज्या संस्कृतीच्या कुसाआड राहिले, त्या संस्कृतीच्या प्राचीन इतिहासाचा कुलारंभ देणारे हे साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे या भूमीने प्रसविलेल्या आदिम वेदनेचे, जाणिवेचे शब्दरूप होय" मुळातचं हे साहित्य स्वतंत्र, स्वयंभू आणि स्वयंसिद्ध आणि निसर्गाशी आपले नातं सांगणारे त्यांच्या अस्तित्वाइतकी प्राचीन आहे असे प्रा. डॉ. विनायक तुमराम यांनी सांगितले आहे.

आदिवासी साहित्य चळवळीत बाबाराव मडावी हे सर्वपरिचीत आहे. आपल्या काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथन आणि स्फुट लेखनाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात एक आदिवासी लेखक, कादंबरीकार, कवी,

कथाकार म्हणून ओळखले जातात. इतर आदिवासी लेखकाप्रमाणे यांचाही मराठी साहित्य लेखनात मोलाचा वाटा आहे. बाबाराव मडावी हे व्यक्तिमत्व, एक लेखक, सामाजिक कार्यकर्ता या दोन्ही अंगानी न्याहाळण्यासारखा आहे. सामाजिक कार्यकर्ता या नात्याने ज्या समाजात आपण जन्माला आलो. त्या समाजाचे ऋण फेडण्यास कटीबद्ध असलेले व्यक्तिमत्व आहे. कुटूंब सांभाळता, सांभाळता सामाजिक भान लक्षात घेऊन साहित्य निर्मितीची कास धरली त्यातून त्यांच्या सामाजिक आणि वाङ्:मयीन बांधिलकीचा प्रत्यय येतो. बाबाराव मडावी यांनी आदिवासी साहित्यात काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथन आणि स्फुट लेखन या वाङ्:मय प्रकारात लेखन केले. त्यांनी 'आकांत' आत्मकथन (१९९८) 'टाहो' कादंबरी (१९९८), 'पाखरं' कविता संग्रह (२००९) 'भाकर' कथासंग्रह २०१३, 'आदिवासी साहित्य शोध आणि समिक्षा वैचारिक लेख' आणि समिक्षा लेख २०१३ प्रकाशित केली आहे. त्यांच्या समग्र साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

बाबाराव मडावी यांचे 'आकांत' या आत्मकथनांत आदिवासींच्या प्रश्न, समस्यांचे अंतर्मुख करणारे ज्वलंत चित्रण आहे. असा एक जनसमुह नागरी, ग्रामीण जीवनापासून दूर जंगलजिव्हाऱ्यांत, दऱ्याखोऱ्यात राहून जीवनाचा अर्थ शोधणारा आहे.

या आत्मकथनाचं एक महत्वपूर्ण विशेष म्हणजे हे आत्मकथन केवळं आदिवासी जीवन जाणीवाचं घेऊन येत नाही, तर त्याचबरोबर दलित, भटके, कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी या सर्व मानवी जीवनाच्या वेदणा घेऊन येते. या आत्मकथनात बाबाराव मडावी आपल्या संसाराची ससेहोलपट, जीवनाची धडपड करत संघर्ष करतांना दिसतात. 'आकांत' हे आत्मकथन हे बाबाराव मडावीचं जरी असले तरी त्यात फक्त त्यांच्याच एकट्याचेच जीवनानुभव नाही तर सबंध आदिवासी जीवनाची व्यथा आहे. बाबाराव मडावी आपल्या मनोगतात म्हणतात की, 'माझं हे पुस्तक केवळ माझं नसून कष्ट करणाऱ्याच्या जीवनाचं पान आहे.' या मनोगतातून कष्ट करणाऱ्या शोषितांसाठी लढा देण्याची भाषा करतात. आपल्या दारिद्र्याच्या वेदनेचं वर्णन करतांना लेखकाची आई आपली मुलगी पंचीला म्हणते ''आपल्या समाजाले गरीबीचा सराफ आहे. कष्ट करूनबी पुरत नाही. मी ऐवढी मरमर कष्ट करतो तं तुले सुख नाही भेटत. माहेरीस सुख नायी तं सासरी काय भेटणार आहे. कुठं बी गेलं त कष्ट करणं आपल्या पाचवीले पुजले काय ?'' त्यांच्या आईच्या या विधानावरून स्त्री जीवनाची व्यथाही आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. म्हणूनचं आदिवासी साहित्यात या आत्मकथनाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

'टाहो' ही कादंबरी आदिमांच्या प्रश्न समस्येबाबत अंतर्मुख करणारी लघू कादंबरी असून वास्तव जीवणाचा उलघडा करणारी वास्तववादी कादंबरी आहे. बाबाराव मडावी आपल्या कादंबरीच्या मनोगतात अण्णाभाऊ साठेंचा विचार अधोरेखित करताना ते म्हणतात की, 'जंगलातले पक्षी आपल्या संरक्षणासाठी टाहो फोडतात आणि सावध होतात. ते तर पक्षी आहेत आपण आपल्या हक्कासाठी टाहो का फोडू नये? दगडा दगडानी भिंत तयार होते आपन तर मानसं आहो.'' असाच आशय, या कादंबरीत वर्णन केलेला आहे. डोंगरगाव हे असं गाव जंगलजिव्हाऱ्यात, रानाबनात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या या जीवांची कथा यात रोवलेली आहे. या गावातला नायक भिम्या अन्यायाविरूद्ध आवाज उठवत आहे. जंगल गडप झालेल्या अंधारात जीवन

सत्याचा अर्थ शोधत जीवन जगणाऱ्या डोंगरगावच्या आदिवासीच्या जीवनजाणीवा यात उमटलेल्या दिसतात. या कादंबरीत पहिला प्रसंग म्हणजे काश्याची मुलगी मैना हिला किशोर नामक शहरातील विवाहित तरूण तिला आपल्या जाळ्यात ओढतो. तिच्या अब्रुचे लचके ओढत जीवनाची राखरांगोळी करतो आणि शेवटी ग्रामपंचायत तिला गावाबाहेर काढतात. स्त्री जीवनाची होणारी हेडसाड, शहरी पुरूषाच्या विकृत मनोवृत्ताला बळी पडतांना दिसून येते. रामायनात सितेला एकचं लक्ष्मणरेषा ओलांडावी लागली पण या जंगलजिव्हाऱ्यातल्या स्त्रियांना चारही बाजूनी लक्ष्मणरेखा ओलांडाव्या लागतात. कितीतरी प्रश्नांना तोंड द्यावे लागतात. हे स्त्री चित्रणही यात दिसून येते. या कादंबरीचा नायक लहानपनापासून दत्तक म्हणून तालुक्याच्या मामलेदाराकडे मुंबईत राहतो. लहानाचा मोठा झालेला हा भिम्या एम. ए. इंग्रजी आणि एल. एल. बी. करतो. आपलं शिक्षण पुर्ण झाल्यावर आपल्या शोषित समाजाला न्याय मिळून देण्यासाठी आपल्या गावी येतो आणि तिथूनच त्याच्या संघर्षाला, सुरवात होते. भिम्या आपल्या आदिवासी बांधवांना सावकाराच्या पारंपारिक जोखंडातून मुक्त करतो. शहरातून गावात आलेला हा भिम्या इथल्या आदिवासींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यां संविधानाचा पाठ पढवत परिवर्तन घडवून आणतो. म्हणून ही कादंबरी वास्तववादी कादंबरीच्या पंक्तीत जाऊन पोहचते. आंबेडकरवादी साहित्य चळवळीचे जेष्ठ लेखक डॉ. यशवंत मनोहर यांनी या कादंबरीचा गौरव करतांना 'टाहो ही कादंबरी काळजाला हात घालणारी कादंबरी' म्हणून उल्लेख आंबेडकरवादी मराठी साहित्य या ग्रंथात करतात.

'पाखर' काव्यसंग्रह (२००९) साली प्रकाशित झाली. बाबाराव मडावी हे काव्यातील महत्वपूर्ण कवी म्हणून ओळखले जातात. पाखरं या काव्यसंग्रहातील कविता संघर्षप्रवण आहे. आशय अभिव्यक्तीतही स्विकार–नकार, विद्रोहाची भाषा व्यक्त करणारी वाटतो. त्यांच्या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून सभोवतालचे उघडे नागडे रूप, शोषण, विषमता, वेदना, विद्रोह तर आहेच पण त्याच बरोबर स्वातंत्र्य, समता, बंधूता या मानवी मुल्याला कवटाळणारी त्यांची कविता आहे असं म्हणावे लागेल. काही महत्वपूर्ण कवितेत उजेड, लोकशाही, शिकार, पाऊस, हे प्रिये, या कविता लोकांपर्यंत पोहचतांना दिसतात. लोकशाही या कवितेत आपल्या अधिकाराची, हक्काची भाषा करतांना ते म्हणतात की,

" पण ज्याले पोट दाखवलं
त्यानं पोट कापल
ज्याले हात दाखवले
त्यानं हात छाटले
आता आम्ही
लाचारी पत्करून
काही सांगणार नाही
शोषण कर्त्याचे मुर्दे
पाडल्याशिवाय थांबणार नाही !"

असा विद्रोह, नकार कविततेतून रेखाटलेला दिसते. हा नकार, विद्रोह प्रचंड विध्वंसाची भाषा वापरतांना दिसतो.

'भाकर' हा बाबाराव मडावी यांचा महत्वपूर्ण कथासंग्रह २०१३ मध्ये प्रकाशित झाला. एकूण सोळा कथेच्या रूपात वाचकांपर्यंत आला. यातली एका–एका कथेत भाकरीच्या शोधात वनवन भटकत राहणारा हा समाज डोळ्यासमोर दिसतो. या कथासंग्रहातील पहिली कथा क्रांतीची मशाल पेटवण्यास, लढा देण्याऱ्या जागो नायकाच्या रूपाने भेटतो. इथल्या प्रस्तापित व्यवस्थेला हादरा देत, विरोध करत या नायकाला आपल्या जीवनाची आहुती द्यावी लागते त्याचा जीवन संघर्ष या कथेत आलेला दिसतो. या कथा संग्रहातील पहिली कथा क्रांतीची मशाल पेटवण्यास, लढा देण्याऱ्या जागो नायकाच्या रूपाने भेटतो. इथल्या प्रस्थापीत व्यवस्थेला हादरा देत विरोध करत या नायकाला आपल्या जीवनाची आहुती द्यावी लागते. त्याचा जीवन संघर्ष या कथेत आलेला दिसतो. 'भाकर' ही कथाही बाज्या आणि बायजाच्या जीवनाची ससेहोलपट, भाकरीसाठी करावा लागणारा संघर्ष, सावकारामुळे कुटूंबाची झालेली दशा याचं वर्णन 'भाकर' कथेत रेखाटतांना दिसते. बाबारावांची 'अपंग प्रेमाच्या किंकाळ्या या कथेत सुरेश आणि शांताची प्रेमकहाणी काळीज हेलावून टाकते. पोटाची खळगी भरण्यासाठी अठरा वर्षाची कोवळी पोरगी निशा जेव्हा उदरनिर्वाहासाठी बाहेर पडते तेव्हा समाजमन अश्लिलतेने तिच्याकडे पाहतात. या स्त्रीजीवनाला पोटापाण्यासाठी घुंगरू बांधून नाचावे लागते. ती म्हणते की,' पापी पेट के लिए नाचती हूं ... संसार के सभी हमारे गांव है. जहा रोटी है वही हमारा गांव है ।'' एकूणच तिची वेदना मानवी मनाचा ठाव घेते. बिकट परिस्थितीतही संकटांना झेलत समोर जाणारी कष्ट करणारी मानसं 'पोरा गळफास काढून टाकं' असं सदोबा महादुला म्हणतो. ही कथा वाचली की, आपल्या डोळ्यासमोर शेतकरी दिसतो त्या शेतकऱ्याला आत्महत्येपासून कसं परावृत्त करावं हे शिकवते. आजच्या युगामध्ये माणूसकी हरवलेली माणसे 'फसव्या चेहरा' या कथेच्या निमित्याने भेटते. ही कथा वाचल्यावर विठ्ठल वाघांची कविता आठवते. 'असा कसा झाला रे माणूस, कडू लिंबाचारे पाला, येल काकळीचा होता, बार कारल्याचा आला.' म्हणजेच माणसाची माणुसकी कुठेतरी हरविलेली दिसते ते चित्रण या कथेत येते.

बाबाराव मडावींच्या बऱ्याचं कथा ह्या मानवी मनाचा ठावं घेते. पोटासाठी होणारी होरपड, मानवी जीवनाची भाकरीसाठी जीवनाची कशी राखरांगोडी होते. याचे विदारक दर्शन कथासंग्रहात होताना दिसते. आदिवासी साहित्य शोध आणि समिक्षा वैचारिक लेख आणि समिक्षात्मक लेखांचा संग्रह हा ग्रंथ ही तितकांच महत्वाचा आहे. विविध लेखांचा संग्रह त्या ग्रंथामध्ये समाविष्ट केलेला दिसतो.

एकंदरीत बाबाराव मडावी यांच्या विविधांगी साहित्य प्रकाराच्या लेखनामुळे महाराष्ट्राच्या साहित्य वर्तुळात 'आकांत' या आत्मकथनाने 'आकांतकार' म्हणून तर 'टाहो' या कादंबरीने कादंबरीकार म्हणून 'पाखर' या काव्यसंग्रहाने कवी म्हणून तर 'भाकर' या कथासंग्रहाने 'कथाकार' म्हणून नावलौकिक प्राप्त केला. खऱ्या अर्थाने बाबाराव मडावी यांच्या समग्र वाङ्:मयाच्या माध्यमातून जगातील जीवांच्या प्राचीनतेबद्दल त्यांच्या दु:ख दैन्याबद्दल, प्रश्न, समस्या, आशा, आकांशा, त्याच्या भाव–भावना त्यांच्या बोलीबद्दल आणि वेगवेगळ्या जाणिवांचे दर्शन घडतांना दिसून येते. त्यांच्या या विविधांगी लेखनामुळे त्यांचा आदिवासी लेखनात महत्वाचे

योगदान आहे. त्यांच्या या योगदानामुळे मराठी साहित्यातही महत्वाची भर पडली असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. प्रा. डॉ. तुकाराम विनायक, आदिवासी साहित्य दिशा दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १५ नोव्हे. २०१२.

२. मडावी बाबाराव, आकांत (आत्मकथन), सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथम आवृत्ती १९९८.

३. मडावी बाबाराव, टाहो (कादंबरी), मिलींद प्रकाशन, वर्धा, तृतिय आवृत्ती १९९८.

४. मडावी बाबाराव, पाखरं (काव्यसंग्रह), प्रियंका प्रकाशन, यवतमाळ, प्रथम आवृत्ती २००९.

५. मडावी बाबाराव, भाकर (कथासंग्रह), अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर.

६. मडावी बाबाराव, आदिवासी साहित्य शोध आणि समिक्षा (वैचारिक लेख आणि समिक्षा लेख) देवयानी प्रकाशन, यवतमाळ, २०१३.

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

An International Multidisciplinary Quarterly Research Journal

# AJANTA

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

ISSN 2277 - 5730
Volume - VIII, Issue - I, January - March - 2019
Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. नितीन जगदिश टेकाम

As a Recognition of the Publication of the Paper Entitled

आदिवासी साहित्यात बाबाराव मडावी यांचे योगदान

Editor : Vinay S. Hatole

Ajanta Prakashan,
Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877 Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com